# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

**परिपत्रक क्र.१९२/२०१६**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील क्रमांक संकिर्ण २०१६/प्र.क्र.१५५/१६/सहा, दिनांक ०७/०९/२०१६ रोजीच्या परिपत्रकान्वये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्जदाराकडून जन माहिती अधिकारी वा प्रथम अपिलीय अधिकारी यांची माहिती मागीतली गेल्यास ज्या जन माहिती अधिकारी वा प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याशी ती संबधीत आहे, त्या संबधीत जन माहिती अधिकारी वा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याशी संबधीत असलेल्या प्रकरणात स्वतः निर्णय घेऊ नये, व अशा प्रकरणात संबधीत सार्वजनिक प्राधिकरणाने दुसऱ्या जन माहिती अधिकाऱ्याची/प्रथम अपिलीय अधिकाऱ्याची नियुक्ती करणे आवश्यक आहे असे निर्देश दिलेले आहेत. सदरचे परिपत्रक माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव यासोबत जोडण्यात आले आहे.

**(डॉ. नरेंद्र मा. कडू)**
**कुलसचिव**

**गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.**
**जा.क्र. - मा.अ./२०१६/२७८५**
**दिनांक -२७/१०/२०१६.**

**<u>सोबत :-</u>** वरीलप्रमाणे शासन परिपत्रक.

**<u>प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-</u>**

१) सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७.
२) सर्व शाखाप्रमुख, प्रशासकीय शाखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७.
३) सर्व प्राचार्य/संचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.

**माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत स्वता:शीच संबंधीत माहिती अर्ज वा अपील अर्ज निकाली न काढण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१६ /प्र.क्र.(१५५/१६) सहा.**
मंत्रालय, मुंबई - ४००० ३२.
दिनांक- ७.९.२०१६.

**परिपत्रक:-**

माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती मागविणाऱ्या अर्जदारांकडून काही वेळा संबधीत जन माहिती अधिकाऱ्याची वा प्रथम अपील अधिकाऱ्याची वैयक्तीक माहिती मागीतली जाते. वैयक्तीक स्वरूपाची माहिती उपलब्ध न झाल्यास अशा अर्जदारांकडून प्रथम अपील केले जाते. काही वेळा ज्या जन माहिती अधिकाऱ्याकडून वा प्रथम अपील अधिकाऱ्याकडून त्याच्या स्वत:शी संबंधीत माहिती मागविण्यात येते तेच अधिकारी असे माहिती अर्ज किंवा अपील अर्ज निकाली काढतात असे निदर्शनास आले आहे. अशाच स्वरूपाच्या एका प्रकरणी प्रथम अपील अधिकाऱ्याची वैयक्तीक माहिती मागीतली असता त्यांनीच त्या प्रकरणी निर्णय दिल्याचे दिसते. No man can be a judge in his own cause हे न्यायदानाचे मूळ तत्व विचारात घेता, स्वत:शी संबंधीत असलेल्या प्रकरणात संबंधीत माहिती अधिकारी वा प्रथम अपील अधिकाऱ्याने स्वत:च निर्णय घेणे उचित नाही व अशा प्रकरणात संबंधीत सार्वजनिक प्राधिकरणाने दुसऱ्या जन माहिती अधिकाऱ्याची/ प्रथम अपील अधिकाऱ्याची नियुक्ती करणे आवश्यक वाटते. या अनुषंगाने सर्व विभागांना सूचित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तदनुसार शासन पुढीलप्रमाणे सूचित करीत आहे.

२. माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याची/कर्मचाऱ्याची वैयक्तीक माहिती मागविलेली असल्यास संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्याने त्याबाबत स्व:ताच निर्णय करू नये. अशा माहिती अधिकार प्रकरणी संबंधीत सार्वजनिक प्राधिकरणाने, अन्य जन माहिती अधिकारी वा प्रथम अपील अधिकाऱ्याची त्या विनिर्दिष्ट प्रकरणी नियुक्ती करावी.

३. उपरोक्त परिपत्रकातील तरतूदी सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख, सार्वजनीक प्राधिकरण तसेच सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व तदनुसार आवश्यक कार्यवाही करण्याबाबत त्यांना सूचित करण्यात यावे.

४ सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्र. २०१६०९०७१५२१३०६४०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Rajendra M Jadhav

Digitally signed by Rajendra M Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GENERAL ADMINISTRATION DEPT., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=656ebca17998fd5c29178a5abcf1aa60d72bd5515ddc791d9ad9786418f07e4f, cn=Rajendra M Jadhav
Date: 2016.09.07 15:22:59 +05'30'

**(रा.मा.जाधव)**
**शासनाचे उप सचिव.**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री / मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव.
३) सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.
५) सर्व राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.
६) *प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
७) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
८) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
९) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१०) प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
११) मंत्रालयीन विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
१२) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
१३) सर्व मंत्रालयीन विभाग
१४) सर्व विभागीय आयुक्त
१५) महासंचालक, यशदा, पुणे
१६) सर्व जिल्हाधिकारी
१७) निवडनस्ती, सा.प्र.वि. कार्यासन सहा.

***पत्राने**